
ISSN-2320-4439
RNI No.MAHAUL03008/13/2012-TC
UGC Approved

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Refereed Research Journal

**VOLUME : I ISSUE IV Jan. - Mar.- 2019**



2018-19

Jan-March 2019

(2)

UGC Approved Sr.No.45681

ARTS | COMMERCE | SCIENCE | AGRICULTURE | EDUCATION
MANAGEMENT MEDICAL | ENGINEERING & IT | LAW | PHARMACY
PHYSICAL EDUCATION | SOCIAL SCIENCE | JOURNALISM

Editor
**Dr. Sadashiv H. Sarkate**
E-mail : powerofknowledge3@gmail.com
www.powerofknowledge.co.in

Scanned with CamScanner

RNI No. MAHAUL03008/13/1/2012-TC

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Refereed Research Journal

UGC Approved

Editor

Dr. Sadashiv H. Sarkate

● Mailing Address ●

Dr. Sadashiv H. Sarkate

Editor : POWER OF KNOWLEDGE

Head of Dept. Marathi

Art's & Science College, Shivajinagar, Gadhi, Tq. Georai Dist. Beed-431 143 (M.S.)

Cell. No. 9420029115 / 7875827115

Email : powerofknowledge3@gmail.com /

shsarkate@gmail.com

Price : Rs. 500/-

Annual Subscription: Rs. 2000/-

Scanned with CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| 15 | दलितांची आत्मकथने | प्रा. डॉ. दिलीप कसबे | 62 |
| 16 | Global and Local in Amit Chaudhuri's Strange and Sublime Address | Dr. Laxmikant Bahegavankar | 68 |
| 17 | EMPLOYEE SAFETY MEASURES FOR BETTER WORKING CONDITION | Wilson Kandre | 70 |
| 18 | Agricultural distress: Rising of farmers Problems & Suicide | Dr. Syed Tanvir Badruddin | 73 |
| 19 | मराठी ग्रामीण कादंबरीतील सहकाराची स्थितीगती | प्रा. डॉ. बबन गायकवाड | 76 |
| 20 | Gamma ray interaction studies of some metal oxides in the energy range of 122KeV-1330KeV | Pradip S. Dahinde<br>Dr. Pravina. P. Pawar | 81 |
| 21 | मोहन राकेश के कथासाहित्य में वर्तमान जीवन का यथार्थ | डॉ. आबासाहेब राठोड | 91 |
| 22 | वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील जाणीवा | प्रा. डॉ.धनंजय महादेव होनमान | 94 |
| 23 | जिल्हा नियोजन व विकास प्रक्रियेत जिल्हा नियोजन समितीची भूमिका: बीड जिल्हा एक अभ्यास | अश्विनी भास्करराव बनकर | 97 |
| 24 | महिला सबलीकरणाची सामाजिक अपरिहार्यता | प्रा. डॉ. माधव माणिकराव मोरे | 100 |
| २५ | ग्रामीण कादंबरीतील शेतकरी आंदोलनांचे चित्रण | डॉ.सुभाष शालबा गव्हाणे | 104 |
| | | | |
| | | | |


Scanned with CamSca

Power of Knowledge UGC Approved Journal Volume : I Issue : IV Jan. to Mar. - 2019 ISSN 2320- 4494 Impact factor 2.7286

# ग्रामीण कादंबरीतील शेतकरी आंदोलनांचे चित्रण

डॉ.सुभाष ज्ञानबा गव्हाणे
मराठी विभाग,
शि.प्र.म.तात्यासाहेब महाजन कला व वाणिज्य महाविद्यालय, चिखली, जि.बुलढाणा

## प्रास्ताविक

शेती आणि शेतकरी हा आपल्या कृषिअर्थव्यवस्थेचा नव्हे तर संपूर्ण समाज रचनेचा कणा असून जोपर्यंत त्यांची स्थिती सुधारत नाही तोपर्यंत कोणतेही मौलिक स्वरूपाचे सामाजिक परिवर्तन येथे घडून येण्याची शक्यता नाही. असे भाकीत ज्योतिरावं फुले यांनी त्यांच्या काळात केले होते. इतिहासाकडे दृष्टिक्षेप टाकल्यास इंग्रजांच्या काळापासूनआपली हलाखीची परिस्थिती सुधारण्यासाठी शेतकऱ्यांचीकाही आंदोलने झालेली बघावयास मिळतात. अनेक चळवळी उभ्या राहिलेल्या दिसतात. शेतकरी संघटनेने देखील शेतकऱ्यांची मोठी आंदोलने उभी केलीत आणि शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केलेलादिसतो. स्वातंत्र्यपूर्व काळात अशी छोटी-मोठी शेतकरीआंदोलने झालीत.मात्र शेतकऱ्यांची राजकीयव्यासपीठाबाहेर उभी राहिलेली चळवळ निर्माण होण्यासाठी१९७८ साल उजाडावे लागले.१९७०ते१९८०या दशकात शेतीविषयक अनेक प्रश्न जोरकसपणे पुढे आले व या गरजेतून शेतकरी संघटनेची उभारणी झाली.पुढे या संघटनेमार्फत शेतकऱ्यांचे प्रश्न घेऊन महाराष्ट्रभर विविध आंदोलने झालीत.शेतकऱ्यांनी केलेल्या आंदोलनाचे मराठी ग्रामीण कादंबरी वरही परिणाम झालेले बघावयास मिळतात. अनेक कादंबरीकारांनी ही आंदोलने त्यांच्या कादंबरीच्या कथानकामध्ये गुंफलेली बघावयास मिळतात. त्या अनुषंगाने ग्रामीण कादंबरीतील ह्या आंदोलनांचे चित्रण कितपत वास्तव उतरले आहे याचा शोध घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोधनिबंधात केला आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये काही कादंबऱ्यांमधून शेतकरी आंदोलनांचे चित्रण आलेले आहे. वि.वा.हडप यांची 'अन्नदाता उपाशी'(१९३६) या कादंबरीत अनेक कुळांनी संघटित होऊन बाबा देसाई यावतनदाराविरुद्ध आंदोलन उभे केले व शेवटी झालेल्या संघर्षात वतनदारांच्या खून झाल्याचे वर्णन वि.वा. हडप यांनी त्यांच्या कादंबरीत केले आहे.'प्रत्यक्ष राबणारे, घाम गाळणारे शेतकरी बंड करून उठल्याने चिडलेले शेतमालक, त्यांना पैशाच्या लोभापायी मदत करणारे



Scanned with CamScanner

सावकार,पोलीस,गावगुंड यांचा संघर्ष अनेकछोट्या मोठ्या घटना प्रसंगांमधून रेखाटला आहे.काही अद्भुत वाटावे असे प्रसंग या कादंबरीत आहेत." १९३६ मध्ये स्थापन झालेल्या 'किसान सभे'ने शेतकरी कल्याणाच्या काही मागण्या केल्या. त्यामुळे कुळांची कर्जमाफी,कमाल जमीनधारणा,कुळकायदा इत्यादी मागण्या मंजूर झाल्यामुळे जमिनदारी पद्धतीला हादरा बसला होता. र.वा. दिघे यांच्या 'आई आहे शेतात'(१९५६) या कादंबरीत किसान सभेच्या चळवळीतील कुळकायदा यासारख्या विषयाचीवर्णने आलेली आहेत. कुळकायदा आल्यामुळेकुळे आणि जमीनदार यांच्यामध्ये संघर्ष निर्माण झाला.'कसेल त्याची जमीन' याशासकीयना-यामुळेकुळांमध्ये मोठ्या प्रमाणात जागृती निर्माणझाली होती.त्यामुळे शेतकऱ्यांच्या जमीनदाराविरुद्धच्या विविध आंदोलनांचे पडसाद तत्कालीन ग्रामीण कादंबरीवरपडलेले दिसतात. श्री ना पेंडसे यांच्या 'हद्दपार' (१९५०) या कादंबरीत निर्मल हा तरुण कुळ कायद्याच्या निमित्तानेच आलेला आहे. तो कुणबी मजुरांना त्यांच्या हक्काची जाणीव करून देतो व त्यांना मिळणाऱ्या अत्यल्प मजुरीबद्दल त्यांचा संप घडवून आणतो. परंतु संप फुटतो व हा लढा अयशस्वी होतो. अण्णाभाऊ साठे यांच्या 'वारणेचावाघ'(१९६८) सारख्या कादंबरीमध्ये सुद्धासत्तू हा नायक इंग्रजांविरुद्धच्या लढयासोबतच धनदांडग्यांच्या, सावकारांच्या अन्यायाखाली पिचलेल्या शेतकऱ्यांमध्ये जागृती करून लढा उभा करतो.'इंधन' या हमीद दलवाई यांच्या कादंबरीमध्येकुळकायद्यामुळेजोशेतमालकीचा प्रश्न उपस्थित झालेला आहेत्याचेचित्रणआलेले आहे. नव्याने आलेल्या कुळ कायद्यामुळे भरपूर शेती असणारे मुस्लिम जमीनदार अस्वस्थ होतात.कुळ कायद्यामुळे कुळांनी ताब्यात घेतलेल्या शेतजमिनीवरून मुस्लिम खोत आणि कुळवाडी यांच्यात प्रचंड संघर्ष होतो. कारण कायद्यानुसार जे शेती करणारे आहेत त्यांच्या नावे शेत जमिनी झालेल्या असतात.साठपूर्व काळातील शेतकऱ्यांची ही झालेली आंदोलने संघटित स्वरूपात नसली तरी शेतकऱ्यांवर झालेल्या अन्यायाविरुद्ध एखाद्या भागामध्ये कुणाच्या तरी नेतृत्वातआंदोलने झालीत व व ग्रामीण कादंबरीमध्येत्याचीइतकी तितकी दखल मराठी कादंबरीकारांनी घेतलेली दिसते.

१९७८-८० च्या दरम्यान श्री शरद जोशी यांच्या वैचारिक नेतृत्वामध्ये उभी राहिलेली शेतकरी चळवळ ही महाराष्ट्रातील एक प्रभावी, बिगर राजकीय चळवळ मानली जाते.शेकडो वर्षांपासून चैतन्य हरवलेला बळीराजा जागृत होण्याचा हा कालखंड म्हणावा लागेल. अल्पावधीतच शेतकऱ्यांनी शरद जोशी यांच्या नेतृत्वात शेतकरी संघटनेला प्रचंड प्रतिसाद दिला. याबद्दल आनंद यादव म्हणतात '१९८०च्या आसपास शेतकरी संघटनेचा जन्म झाला.सर्वार्थाने ही एक वेगळी आणि विलक्षण गतीमान संघटना आजही कार्यरतआहे.........गेल्या अठरा वीस वर्षात शेतकऱ्यांचे शोषण शहरांनी,तेथील भांडवलशहा,व्यापारी,उद्योजक,सरकार,निराळ्या पक्षातील ढोंगीवृत्तींनी, या



Scanned with CamSca

सर्वांना सामील असलेल्या आणि ग्रामीण विभागातूनच निवडून गेलेल्या संधीसाधू आमदार खासदार यांनी कसे केले आहे, याविषयीचे विचार ही संघटना शेतकऱ्यांना कळेल आणि पटेल अशा सोप्या भाषेत मांडत असते.....शेतमालाच्या उत्पादन खर्चावर आधारित किंमत शेतमालाला मिळावी एवढ्या एका महान सूत्रावर आधारित या चळवळीचे तत्वज्ञान आहे. त्यामुळे ही चळवळ अज्ञ, अडाणी शेतकऱ्यांना सहज कळते,आपलीशी वाटते. ते तिच्यात सक्रिय भाग घेतात.'[२]त्यामुळे१९८०नंतर संपूर्ण महाराष्ट्रात विशेषतः पश्चिम महाराष्ट्रात शेतकरी संघटनेची प्रचंड आंदोलने झालीत हमी भावासाठी संघर्ष झाला. त्यामुळे ग्रामीण नाळ असलेल्या लेखकांनी आपल्या साहित्य मधून या आंदोलनांना प्रतिबिंबित केलेले दिसते आणि आपल्या साहित्याच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या प्रश्नांना हात घातलेला दिसतो.

हाल्या हाल्या दुधू दे'(१९८५) या बाबाराव मुसळे यांच्या कादंबरी मध्ये अकोल्यातील शेतकरी संघटनेच्या कापूस भाव आंदोलनाचे वर्णन येते.न्यानबा अकोल्याला दवाखान्यातजातो आणि आंदोलनात अडकतो. आंदोलनात आंदोलकांवर लाठीहल्ला होतो,पळापळी होते व आंदोलन चिरडले जाते. शेतकरी आंदोलन हा मुख्य विषय कादंबरीचा नसला तरी तत्कालीन आंदोलनाचे काहीसे पडसाद या कादंबरीतून उमटतात. रा.रं बोराडे यांच्या 'चारापाणी'याकादंबरीमध्ये शेतकरी संघटनेच्या विचारसरणीबाबतचा विषय येतो. रास्त भावाच्या मागणीबाबत अनेक वाद होते, कारण रास्त भावाच्या मागणीचा खरा फायदा नगदी पिके घेणाऱ्या श्रीमंत बागायतदार शेतकऱ्यांनाचआहेहेरा.रं. बोराडे यांना सुद्धा वाटत होते. कादंबरीमधील सुखदेव च्या काही वाक्यांवरून शेतकरी संघटना फक्त बागायतदार शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करते. मात्र त्याच वेळेस कोरडवाहू शेतकरी संकटात असताना,दुष्काळात असताना त्यांचे प्रश्न सरकार दरबारी मांडण्याऐवजी ज्वारीपरिषद,महिला मेळावे अशा कार्यक्रमांचे आयोजन करते. ही बाब कुठेतरी बोराडे सरांना खटकते. डॉ.सेलार यांनी घेतलेल्या मुलाखतीतही बोराडे सर म्हणतात,"शेवटी शेतकरी संघटनेने जी काही आंदोलने केली ती कशाची आंदोलन केली? सर्वसाधारण ज्याला आम्ही जिरायतदार किंवा कोरडवाहू शेतकरी म्हणतो, त्यांच्या कुठल्याच आंदोलनात शरद जोशी नव्हते.नंतरच्या काळात, कदाचित काळ बदलला असता तर ते खालपर्यंत आलेही असते.ऊस उत्पादक,कांदा उत्पादक,नाशिक वगैरे भागातला शेतकरी यांच्या संदर्भातही आंदोलनं प्रामुख्याने झाली आणि आमचा बेस होता तो मराठवाड्यातला कोरडवाहू शेतकरी,शेतमजूर."[३]'चारापाणी' मधील दुष्काळाचे चित्रण मराठवाड्यातले होते. मराठवाड्यातला जास्तीत जास्त शेतकरी कोरडवाहू शेती करणारा आणि शेतकरी संघटनेने आजवर कोरडवाहू शेतकऱ्यांचे प्रश्न फारसे उचलून धरलेले नाहीत. हीच बाब प्रस्तुत कादंबरीतून बोराडे सरांनी मांडली आहे.

नव्वदोत्तर काळातील विश्वास पाटील यांची 'पांगिरा' ही कादंबरी पाणीटंचाईच्या प्रश्नाबरोबरचकांद्याच्याहमीभावाबद्दलचे आंदोलनही चित्रीत करते.ऐन कांद्याचे हंगामात व्यापारी कांद्याचे भाव पाडतात. त्यातून व्यापारी आणि शेतकरी यांच्यातला संघर्ष बघावयास मिळतो.बाजार समितीमध्ये प्रचंड गोंधळ निर्माण झाल्यामुळे गोळीबार, अश्रुधुराच्या माऱ्यात पंधरा शेतकरी शहीद होतात. विश्वास पाटील यांनी कांद्याचे उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्यांचा अत्यंत महत्वाचा प्रश्न प्रस्तुत कादंबरीतून अत्यंत जोरकसपणे चित्रित केला आहे. अशी परिस्थिती असली तरी शेती हा आतबट्ट्याचा व्यवहार आहे हेच यातून दिसून येते.याबाबतचे अनेक प्रश्न 'पांगिरा'या कादंबरीतून व्यक्त केले आहेत. सदानंद देशमुख यांच्या 'तहान' या कादंबरीत पिण्याच्या पाण्यासाठीसारंगपूरवासियांचे झालेले तीव्र घागर आंदोलन दृष्टीस पडते.राजकारणी,अधिकारी यांना अडवण्यात येऊन सभा भरविली जाते. सभेत ग्रामसेवकावर घागरी फेकून मारल्या जातात. सभेत प्रचंड गोंधळ होतो. पळापळी होते. शेवटी पोलिसांना लाठीचार्ज करावा लागतो.आपल्या समस्या सोडविण्यासाठी ज्या समाजाचा कधीही उद्रेक होत नव्हता तो आता थोड्या प्रमाणात का होईना त्याबाबतीत जागृत होऊ लागलेला दिसतो.

एकविसाव्या शतकामध्ये सुरुवातीलाच शेतकऱ्यांचे प्रश्न अधिकाधिक बिकट होत गेलेले दिसतात.त्यामुळेशेतकरीआंदोलने देखील व्यापक स्वरूपातव्यक्त होतात. सदानंद देशमुख यांचीच 'बारोमास'ही कादंबरी त्या बाबतीत अत्यंत महत्वाची कादंबरी आहे.शेतकरी संघटनाही शेतकऱ्यांचे प्रश्न घेऊन लढणारी संघटना आहे. सदानंद देशमुख यांनी 'बारोमास' चे लेखन केले त्यावेळेस अशी आंदोलने महाराष्ट्रभर सुरू होती. या आंदोलनाचे प्रतिबिंब 'बारोमास' मध्ये उमटले आहे. तेजराव खपके, नरुभाऊ, कादंबरीचा नायक एकनाथ हे शेतकरी संघटनेचे सच्चे कार्यकर्ते आहेत. नरुभाऊ, तेजराव खपके यांच्या भाषणांमधून आणि चर्चेमधून शेतकरी संघटनेची भूमिका काहीशी स्पष्ट होते. शेती विकास मंडळाच्या मेळाव्यात नरुभाऊ विविध तज्ञांना शेतकऱ्यांच्या मार्गदर्शनासाठी बोलावतात. त्यामध्ये शेतकऱ्यांच्या महत्त्वाच्या निसर्ग, बाजारपेठा व आयात निर्यात-धोरण या तीन शत्रूंची ओळख करून देण्यात येते.मिश्रपिके, खतवापर, वनशेती, फळबागा, स्वयंविक्री इत्यादी विषयांवर मार्गदर्शन केले जाते. 'संघटना नसती तर शेतकर्यांचे हाल कुत्र्याने खाल्ले नसते'तेजराव खपकेंची संघटनेबद्दलची ही भूमिका आहे. शेतकऱ्यांना मिळणारी सबसिडी व्यापारी कसे खातात, वीज कमी आणि बिलं कशी जास्त येतात, सरकारचे आयात-निर्यात धोरण शेतकऱ्यांना कसे मारक ठरते, पगारदारांचे पगार चाळीस-पन्नास पटवाढले पण शेतमालाचे भाव फक्त सहापट कसे वाढले, शेतकऱ्यांच्या जमिनी व्यापारी का खरेदी करतात?, संघटना फुटली तर शेतकऱ्यांना ते कसे मारक ठरेल? अशा इत्यादी प्रश्नांची चर्चा शेतकरी संघटनेच्या कार्याच्या



Scanned with CamScanner

निमित्ताने होताना दिसते. शेवटी कापसाच्या भावाच्या संदर्भात चक्काजाम आंदोलन आणि नायक एकनाथ व इतर कार्यकर्त्यांना झालेली अटक यातून शेतकऱ्यांच्या प्रश्नांचालढा व्यापक प्रमाणावर सुरू झाला असे दिसते. या कादंबरीबद्दल रामचंद्र काळुंखे म्हणतात, 'लहरी पावसाने शेती पिकत नाही. वाढणाऱ्या पिकांची जोपासना करता करता जेरीस यावे लागते. यातून कशाबशा तयार झालेल्या शेतमालाला भाव मिळत नाही. या दुष्टचक्रातून शेतकरी कर्जखाईत लोटल्या जातो. आजही शेतकऱ्याला सावकारकीचाच आधार वाटतो.'[4]ही परिस्थितीबदलण्यासाठी मग सुरू होतात आंदोलने. या आंदोलनाचे वास्तव चित्र देशमुख यांनी रेखाटले आहे. खानदेशातील प्रत्यक्ष झालेले केळीफेको आंदोलन'पाडा' या अशोक कौतिक कोळी यांच्या कादंबरीतून व्यक्त होते. कादंबरीचा नायक चांगदेवतापीकर हाच हे आंदोलन पेटवतो. मार्केटमध्ये व्यापारी केळीचे भाव पाडून केळी खरेदी करतात. त्यामुळे बाजार समितीत शेतकऱ्यांना संघटित करून चौकात केळीफेको आंदोलन पार पडते. या कादंबरीच्या केंद्रभागी सुद्धा शेतमालाच्या भावाचाच प्रश्न आहे. जास्त पिकलं तरी मालाच्या भावाचा प्रश्न आणि नाही पिकलं तरीही समस्या कायमच. अशा गर्तेत सापडलेल्या शेतकरीमनाचा मग उद्रेक होतो आणि तो आपल्या हक्कांसाठी आंदोलन आणि संघर्ष करण्यास तयार होतो. मग तो विदर्भातील संत्री उत्पादक शेतकरी असो अथवा पश्चिम महाराष्ट्र वा मराठवाड्यातील ऊस उत्पादक शेतकरीअसो अथवा खानदेशातील केळी उत्पादक शेतकरी असो; साऱ्यांची व्यथा एकच आहे ती म्हणजे त्यांच्या मालाचा भाव त्यांना ठरवता येत नाही. ह्या एका प्रश्नातूनच शेतकऱ्यांची आजपर्यंतची सर्व आंदोलने उभी राहिली आहेत.

अगदी अलीकडील काळात विशेष आर्थिक क्षेत्र (सेझ) विकसित करण्याच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांच्या जमिनी अधिग्रहित करण्यात आल्या. शेतकऱ्यांना अल्प मोबदला देऊन सरकारी नियमांचा धाक दाखवून एक प्रकारे जोर जबरदस्ती ह्या जमिनी घेऊन उद्योजकांच्या ताब्यात देण्यात आल्या.सेझ विरोधातमहाराष्ट्रामध्ये खूप मोठी आंदोलने झालीत. त्यांचेही पडसाद ग्रामीण कादंबरीतून उमटले आहेत. शंकर सखाराम यांची 'एसईझेड'ही कादंबरी त्यासाठी महत्त्वाची आहे.सेझ च्या रूपानेआलेला हा भांडवलशाहीचा भस्मासूर संपूर्ण रायगड जिल्ह्यातील कृषिसंस्कृती गिळंकृत करून भूमिपुत्रांना विस्थापित करू पाहतो. असं काही होऊ नये यासाठी नायक चंदू स्वतः व बाविस गाव संघर्ष समिती विरुद्धसेझ कंपन्या व शासन यांच्यातील हा संघर्ष कादंबरीच्या शेवटापर्यंत बघावयास मिळतो.'काहीही झाले तरी चालेल पण जमीन देणार नाही'ही शेतकऱ्यांची भूमिका आहे. याबद्दल नेताजी पाटील म्हणतात,'एसईझेड हे एका अर्थाने आजचं महाभारत आहे.काळ्या आईवर प्राणपणाने माया करणारा भूमिपुत्र आणि त्याला देशोधडीला लावू पाहणारं मायबाप सरकार यातील संघर्षावर या कादंबरीचं कथानक बेतलेलं आहे. शासनाच्या



Scanned with CamScanner

जोडीला धनदांडगे, भांडवलदार,मतलबी राजकारणी आणि शासनाचे अधिकारी कर्मचारी अशी चार घतुरस्त्र सेना गरीब भूमिपुत्रांच्या विरोधात उभी ठाकली आहे.पैसा, यंत्रणा,बळसारंकाही प्रतीपक्षापाशी आहे. एकाकी लढणाऱ्या शेतकऱ्या जवळ काहीच नाही. एकी हे त्याचंबळ आणि आत्मशक्तीहे शस्त्र अशी ही लढाई आहे.'[5]'एसईझेड'बद्दलचा हा अभिप्राय महत्त्वपूर्ण आहे. कारण याच आत्मशक्तीच्या बळावर हे सेझ विरोधी आंदोलन कादंबरीच्या शेवटापर्यंत सुरू राहते. प्रसंगी शासनाला नमते घ्यावे लागते. पॅकेज बदलून द्यावे लागते.सेझचा आकार कमी करावा लागतो. शंकर सखाराम यांनी वास्तव रुपात पार पडलेले हे आंदोलन कादंबरीतून जसेच्या तसे चित्रित केलेआहे. 'साखरफेरा'हीमोहन पाटील यांची पश्चिम महाराष्ट्रातील ऊसदर आंदोलन चित्रित करणारी महत्त्वपूर्ण कादंबरी आहे.वाढलेली महागाई आणि भ्रष्टाचारामुळे साखर कारखाने शेतकऱ्यांना उसाचा योग्य दर देऊ शकत नाहीत त्यातून 'ऊसबंद' आंदोलन पेट घेते. साखर कारखान्यांची ऊसकोंडी केली जाते. या आंदोलनाला अखिल भारतीय स्वरूप प्राप्त होते. शेवटी केंद्र सरकारला हस्तक्षेप करावा लागतो. संपूर्ण कादंबरीभर या आंदोलनाची चर्चा होत राहते. तर रवींद्र शोभणे यांच्या 'पांढर'मध्ये दुष्काळाने पोळलेल्या खरसोली गावातील व परिसरातील शेतकरी व मजुरांनी नागपूरच्या हिवाळी अधिवेशनाच्या वेळी काढलेल्या दुष्काळग्रस्तांच्या समस्येबाबतच्या मोर्च्याचे चित्रणयेते. शेतकरी संघटनेचे गोविंदअण्णा फाळके सभेला शेतकरी समस्यांबाबत मार्गदर्शन करतात. कृषिमंत्री येऊन निवेदन स्वीकारतात वनैसर्गिक संकटातून मार्ग काढण्यास सरकार कटिबद्ध असल्याचे सांगतात व निघून जातात. अधिवेशन काळात निघणारे मोर्चे हा केवळ राजकारणाचा भाग असतोअसेही रवींद्र शोभणे कादंबरीतून नमूद करतात.

अशाप्रकारे मराठी ग्रामीण कादंबरीतून शेकडो वर्षांपासून पिचत आलेल्या शेतकऱ्यांचे दुःख व त्या दुःखातून सावरण्यासाठी शेतकऱ्यांनी केलेल्या आंदोलनाचे चित्रण कादंबरीकारांनी आपल्या कादंबऱ्यांमधून केलेले आहे.

**निष्कर्ष :-**

मराठी ग्रामीण कादंबरीने शेतकरी आंदोलनाची दखल घेऊन कादंबरीच्या कथानकात आंदोलनांची गुंफण करून शेतकरी आंदोलनाचे वास्तव चित्र उभे केले आहे. साठ पूर्वकाळात फारशी आंदोलने झालेली नाहीत. मात्र तरीही एखाद्या व्यक्तीच्या नेतृत्वात जमीनदार याविरुद्ध जी काही छोटी-मोठी आंदोलने झालीत त्याचीही थोडेफार चित्रण कादंबरीतून येते. साठोतर काळात जवळपास १९८० पर्यंत शेतकऱ्यांच्या आंदोलनाचा वणवा पेटलेला नव्हता. मात्र त्यानंतर जसजशी आंदोलने वाढू लागली तस-तशी ती कादंबऱ्यांमधूनही चित्रित होऊ लागली. कारण तीव्र स्वरूपाच्या



Scanned with CamSca

आंदोलनांना या काळातच प्रारंभ झालेला दिसतो. शेतकऱ्यांची जास्तीत जास्त आंदोलने शेतीमालाच्या रास्त भावासाठी झालेली दिसून येतात. जागतिकीकरणामुळे स्पर्धा वाढली आणि या वाढत्या स्पर्धेमध्ये शेतमालाला योग्य भाव मिळू न लागल्यामुळे अलीकडील दोन दशकांमध्ये आंदोलने उग्र होत गेलेली दिसतात. त्यामुळेच नव्वदोत्तर काळात मराठी ग्रामीण कादंबरीत या आंदोलनाचे चित्र हुबेहूब उमटते.

**संदर्भग्रंथः-**


१) मुलाटे वासुदेव,'ग्रामीण साहित्यः चिंतन आणि चर्चा, स्वरूप प्रकाशन औरंगाबाद, डिसेंबर २००५, पृष्ठ क्र.१०४.

२) यादव आनंद,'अखंड लुटीचा बळी आणि चळवळी','शेतकऱ्यांची हाक'-संपा. डॉ. द. के. गंधारे, स्वरूप प्रकाशन औरंगाबाद, मार्च २००७, पृष्ठ क्र ५१-५२

३) बोराडे रा.रं, 'ग्रामीण साहित्य चळवळीचे सामाजिक व सांस्कृतिकयोगदान',दि.८/१२/२००८ रोजी डॉ. सुधाकर शेलार यांनी घेतलेली मुलाखत, स्वरूप प्रकाशन औरंगाबाद, २००९, पृष्ठ क्र.२२१

४) काळुंखे रामचंद्र, 'बारोमासःशेतकऱ्यांचेदाहकदुःख', 'साक्षात'दिवाळी अंक२००५, पृष्ठ क्र.६३.

५) पाटील नेताजी, 'एसईझेडः ज्वलंत विषयावरील स्फोटक कादंबरी', नव अनुष्टुप,जाने-फेब्रुवारी २००८, पृष्ठ क्र ५२.


❖❖❖❖



Scanned with CamSca